# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 22 November 2025
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २२ नोव्हेंबर २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- देश प्रथम तत्त्वानुसार राष्ट्रनिर्माण हे सर्व संस्थांचं ध्येय असावं–राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- विविध भाषांतील दर्जेदार साहित्याच्या अनुवादासाठी शासकीय अनुदानाची गरज साहित्यिक राजन गवस यांच्याकडून व्यक्त
- विद्यार्थ्यांसाठी एसटी महामंडळ लवकरच ‘हेल्पलाइन’ सुरू करणार
- छत्रपती संभाजीनगर ते परभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासाठी भूसंपादन सुरू
- धाराशिव जिल्ह्यात प्रवासी वाहनाच्या अपघातात चौघांचा मृत्यू

आणि

- बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनची ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत एकेरीच्या अंतिम फेरीत धडक

****

देश सर्वप्रथम या तत्त्वानुसार राष्ट्रनिर्माण हे सर्व संस्थांचं ध्येय असलं पाहिजे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. आंध्रप्रदेशात पुट्टपर्थी इथं श्री सत्य साईबाबा यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमात त्या आज बोलत होत्या. आध्यात्मिक संस्थांनी राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात योगदान द्यावं, असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं. व्यक्तिगत पातळीवर तसंच समाज म्हणून वैश्विक शांतीला बळ मिळावं, आणि संपूर्ण मानवतेचं कल्याण व्हावं, यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहनही राष्ट्रपतींनी केलं. आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

****

हज यात्रेशी निगडित सर्व प्रक्रिया डिजिटल करून मानवी हस्तक्षेप दूर करण्याच्या सूचना केंद्रीय अल्पसंख्याक सचिव चंद्र शेखर कुमार यांनी केल्या आहेत. ते आज मुंबईत हज परिषदेत ते बोलत होते. हज यात्रेसाठी अर्ज करण्यापासून यात्रेहून परतल्यानंतरच्या प्रक्रिया सुद्धा डिजिटल करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

****

उपराष्ट्रपती तथा राज्यसभेचे सभापती सी.पी. राधाकृष्णन यांनी तालिका अध्यक्षांच्या नेमणुका केल्या आहेत. यामध्ये खासदार रजनी पाटील यांचाही समावेश करण्यात आला आहे.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरातील ८०० एकर जागेचा पर्यावरणीय पुनरुज्जीवन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाला झिरोधा कंपनी आणि रेन मॅटर फाऊंडेशन सामाजिक उत्तरदायित्वातून सहकार्य करणार आहेत. महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रकल्प ताडोबामध्ये राबवण्यात येणार असून यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाबरोबरच फार्मर्स फॉर फॉरेस्ट यांचंही सहकार्य यात मिळणार आहे.

****

सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी बैठक घेऊन तोडगा काढावा अशी मागणी सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेनं केली आहे. परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी तसं निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केलं आहे. याबाबत बैठक न झाल्यास येत्या अकरा डिसेंबरला हिवाळी अधिवेशनात विधानभवनावर मोर्चा काढण्याचा इशारा या निवेदनात दिला आहे.

****

मराठी ही ज्ञानभाषा होण्यासाठी साहित्य संमेलनांवर खर्च करण्यापेक्षा जगभरातल्या वेगवेगळ्या भाषांमधलं दर्जेदार, तसंच नोबेलप्राप्त साहित्य लगोलग मराठीत अनुवादित होण्यासाठी सरकारकडून अनुदान दिलं गेलं पाहिजे असं प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केली. आज रत्नागिरी इथं मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळातर्फे एकदिवसीय जिल्हा साहित्य संमेलन भरवण्यात आलं होतं त्यात ते बोलत होते. सरकारचा निधी जगभरातलं तंत्रज्ञान आपल्या भाषेत आणण्यासाठी खर्च व्हावा.

तसंच सरकारनं मराठी शाळा सशक्त कराव्यात, अशी अपेक्षाही गवस यांनी यावेळी व्यक्त केली.

****

शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी – विद्यार्थिनींना त्यांच्या शाळा बस बद्दल माहिती आणि मदत मिळावी यासाठी एसटी महामंडळ लवकरच 'हेल्पलाइन' सुरू करणार आहे, परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. ते आज धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकात विद्यार्थ्यांशी बोलत होते. या अंतर्गत एसटीच्या ३१ विभागातील सर्व विभाग नियंत्रकांचे संपर्क क्रमांक संबंधित शाळा महाविद्यालयांना दिले जातील, विद्यार्थीही आपल्या समस्या या माध्यमातून मांडू शकतील असं सरनाईक यांनी सांगितलं.

****

गोव्यात पणजी इथं सुरू असलेल्या ५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज 'मॉस्किटोज', 'इट वॉज जस्ट ॲन ॲक्सिडेंट', सूर्या बालकृष्णन यांचा 'दीपा दीदी' आणि देबांकर बोर्गोहाईन यांचा 'सिकार' आदी चित्रपट दाखवले जात आहेत. नारी शक्तीचं स्थान अधोरेखित करण्यासाठी यंदा पहिल्यांदाच ५० महिला दिग्दर्शकांचे चित्रपट प्रदर्शित होत असून, यामध्ये सिंपल दुगार यांच्या 'लोकमाता देवी अहिल्याबाई' या चित्रपटाचा समावेश आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या ऐक्यम् परिषदेत विविध देशांच्या सांस्कृतिक राजदुतांनी आज सकाळी बिबी का मकबरा, देवगिरी किल्ला तसंच वेरूळ लेण्यांना भेट दिली. पैठणीसह हिमरू कारखान्यांना भेट देऊन त्यांनी या विणकामाची पाहणी केली.

****

भारतीय रेल्वेनं २०२५–२६ या आर्थिक वर्षात आतापर्यंत एक अब्ज टन माल वाहतुकीचा आकडा ओलांडला आहे. या वर्षात १९ नोव्हेंबरपर्यंत १ अब्ज २ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आल्याची माहिती रेल्वेनं दिली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर ते परभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात रेल्वेमार्गाजवळ असलेल्या तीसपेक्षा अधिक गावांमधील नागरिकांना नोटीस बजावण्यात येत आहे. अंकाई ते

छत्रपती संभाजीनगर आणि पुढे परभणीपर्यंत रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाच्या कामाला वेग आला आहे.

दरम्यान, या कामात अडथळा येणार नाही आणि नागरिकांचं नुकसानही होणार नाही, असा मार्ग काढण्यात येईल, असं माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड यांनी म्हटलं आहे. रेल्वे विस्तारीकरण संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांशी बोलतांना कराड यांनी हे आश्वासन दिलं.

****

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात अणदूर नजीक चिवरी पाटी इथं आज सकाळी क्रूझर गाडीचे टायर फुटल्यानं झालेल्या भीषण अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला असून ५ जण गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये ३ महिलांचा समावेश आहे. हे सर्व प्रवासी सोलापूर नजीकच्या कासेगाव-उळे इथले रहिवासी असल्याचं याबाबतच्या बातमीत म्हटलं आहे.

****

बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. आज झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात लक्ष्यने चिनी तैपेईच्या चाऊ टिएन चेनचा १७-२१, २४-२२, २१-१६ असा पराभव केला. उद्या सकाळी होणाऱ्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत लक्ष्यची जपानच्या युशी तनाका याच्यासोबत लढत होणार आहे.

****

अमरावती इथं नुकत्याच झालेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड परिमंडलाच्या संघानं विविध क्रीडा प्रकारांत ९ सुवर्ण तसंच ९ रौप्यपदकं पटकावली. पदकविजेत्या सर्वांचा प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

****

गुवाहटी इथं भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत कमी प्रकाशाअभावी खेळ थांबला तेंव्हा ब्याऐंशीव्या शटकात सहा बाद २४७ धावा केल्या आहेत.

****

अमरावती इथं नुकत्याच झालेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड परिमंडलाच्या संघानं विविध क्रीडा प्रकारांत ९ सुवर्ण तसंच ९ रौप्यपदकं पटकावली. पदकविजेत्या सर्वांचा प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

****

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ तसंच डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय यांच्यात विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासह शैक्षणिक तसंच संशोधनात्मक देवाण घेवाण मजबूत करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात येणार आहे. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राचं हे अभिनव एकत्रीकरण दोन्ही संस्थांचे विद्यार्थी, संशोधक आणि अध्यापक वर्गासाठी नव्या संधीचं दार उघडणारं ठरणार आहे.

****

तिरुपती श्रीसाईनगर शिर्डी तिरुपती या विशेष रेल्वेगाडीला येत्या ३० नोव्हेंबर ते २९ डिसेंबर या काळात मुदत वाढ देण्यात आली आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क कार्यालयानं ही माहिती दिली.

****

राज्यात आज जळगाव इथं सर्वात कमी ११ अंश तर गोंदियात साडे बारा अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं. अहिल्यानगर इथं १३ पूर्णांक चार, नाशिक इथं १३ पूर्णांक आठ अंश तापमानाची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगर, धाराशिव तसंच परभणी इथं १४ ते साडे १४ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

****